LOKSATTA

Tuesday, Mar 30, 2010.

# 'टाटा क्रुसीबल कॅम्पस क्वीझ'मध्ये आयटीएमची बाजी

**प्रतिनिधी**

मार्कऐवजी रन्स आणि प्रश्नांऐवजी ओव्हर्स... ही प्रश्नमंजुषा घेण्याची अनोखी पद्धत कशी वाटते तुम्हाला? खरं नाही ना वाटत? पण 'टाटा क्रुसीबल कॅम्पस क्वीझ-२०१०' या मुंबई विभागातील अंतिम फेरीच्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत २०-२० क्रिकेटचं असं दृश्य बघायला मिळालं. एकूण २० शहरांमध्ये ही स्पर्धा संपन्न होणार असून २७ मार्च २०१० रोजी मुंबईच्या प्रेसिडेंट हॉटलमध्ये या स्पर्धेची १८ वी प्रादेशिक फेरी पार पडली. उपान्त्य फेरीत प्रत्येकी दोन स्पर्धक असलेले एकूण ३६ संघ सहभागी झाले होते. त्यापैकी अंतिम फेरीत सहा संघ पोहोचले. या सहा संघांमध्ये चुरशीची स्पर्धा होऊन नवी मुंबई येथील आयटीएम महाविद्यालयाचे अनिर्बान मोहांसी आणि सौभाग्य जेना हे विद्यार्थी विजेते ठरले. या वर्षी कॅम्पस क्वीझची ही सहावी आवृत्ती आहे. मुंबईनंतर ही स्पर्धा पुणे आणि मणिपाल या शहरांत होणार असून १० एप्रिल २०१० रोजी मुंबईमध्ये या स्पर्धेची राष्ट्रीय पातळीवरील अंतिम फेरी सादर होणार आहे. त्यावेळी २० शहरांतील विजेते संघ एकमेकांसमोर उभे ठाकतील.

'टाटा क्रुसीकल कॅम्पस क्वीझ' या २००४ साली सुरू झालेल्या स्पर्धेत अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वाणिज्य, विधी आणि वित्त इ. विविध शाखांमधील विद्यार्थ्यांचा समावेश असतो. देशाच्या प्रगतीमध्ये युवक हा सगळ्यात महत्त्वाचा घटक असल्यामुळे त्यांच्याशी संवाद साधणे आणि देशभरातील प्रतिभावान तरुणांना एकत्र आणणे हा या प्रश्नमंजुषेमागचा मुख्य उद्देश आहे. मुख्यत्वे बिझनेसवर आधारित प्रश्न हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य असून स्पर्धकांना या क्षेत्राची आणि त्यात घडणाऱ्या अद्ययावत घडामोडींची कितपत महिती आहे यावरून त्यांचा कस लागतो. म्हणूनच, अनेक विद्यार्थी आपलं ज्ञान तपासण्यासाठी इथे दरवर्षी भाग घेताना दिसतात. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले 'रुटस् कॉर्पोरेशन लिमिटेड'चे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रभात पाणी यांनी विद्यार्थ्यांना नेहमी ज्ञानी माणसांची संगत ठेवण्याचा आणि आपलं ज्ञान नेहमी दुसऱ्यांना देण्याचा सल्ला दिला. तर 'या स्पर्धेत एक पॅशन म्हणून आपलं ज्ञान तपासण्यासाठी भाग घेतला होता. स्पर्धेच्या तयारीसाठी रोज अर्धा-एक तास माहिती मिळवायचो.' अशी प्रतिक्रिया मुंबई विभागाच्या विजेत्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्वीझमास्टर गिरी बालसुब्रमण्यम् ऊर्फ पिकब्रेन यांनी केले. ■